# सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र. 02564 - 210010 ई- मेल: sdonandurbar1998@gmail.com

क्रमांक/2020/फौज/कोरोना नियंत्रण/कावि-213 दिनांक - 20/05.2020

वाचा :- 1) आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 मधील कलम 30,33,34,41 व कलम 51.
2) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील, अधिसुचना क्र.कोरोना 200/प्र.क्र.58 आरोग्य 5 दिनांक 13 मार्च, 2020.
3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसुचना प्र.क्र.58 आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020.
4) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नंदुरबार, यांचेकडील आदेश क्र. 2020/गृह कक्ष-2/ड-2/पीओएल/कावि-254 दिनांक 22/03/2020

## आदेश-

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने संदर्भीय 2 अन्वये कोरोना विषाणुचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च, 2020 पासुन लागु करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 3 अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

मा.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे संदर्भीय 4 अन्वये उपविभागीय दंडाधिकारी नंदुरबार यांची कोरोना विषाणुचा (कोव्हीड-19) संसर्ग,प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 या कायदयातील तरतुदींच्या अंमलबजावणी साठी Incident Commander म्हणुन नंदुरबार तालुक्यासाठी नियुक्ती केलेली आहे.

सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचे अहवालानुसार **मौजे रजाळे ता.नंदुरबार येथे** कोरोना संसर्ग संशयित रुग्ण, वैद्यकीय प्रयोगशाळा चाचणी अहवालानुसार **कोरोना विषाणु** (कोव्हीड-19) **लागण सिध्द** (Positive) झाल्याने **शासनाच्या** Containment Plan च्या मार्गदर्शक सुचना नुसार तातडीने करावयाच्या उपाय योजना अनुषंगाने मी **वसुमना पंत, सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,नंदुरबार** जि.नंदुरबार, खालील प्रमाणे **आदेश पारित** करीत आहे.

- वरील नमुद पत्त्यावर राहणारा रुग्ण कोरोना विषाणु (कोव्हीड-19) लागण सिध्द (Positive) झाल्याने संपुर्ण **रजाळे ग्रामपंचायतीचे** क्षेत्र हे **कंटेनमेंट क्षेत्र** (Containment Area) म्हणुन घोषित करीत आहे. तसेच रजाळे गावाजवळ असलेले **बलवंड ग्रामपंचायतीचे** क्षेत्र हे **बफर झोन** म्हणुन पुढील आदेशापावेतो घोषित करणेत येत आहे.
- **कंटेनमेंट क्षेत्रात** (Containment Area) **पुर्णपणे संचारबंदी लागु राहिल** आणि सदरचे क्षेत्रात प्रवेश आणि निर्गमन करण्यास बंदी असेल (अतितातडीची आणि जीवनावश्यक सेवा वगळुन).
- कंटेनमेंट क्षेत्रात (Containment Area) सर्व घरांचे सर्वेक्षण निर्धारित वेळेत पुर्ण करावे.
- **गट विकास अधिकारी नंदुरबार** यांनी कंटेनमेंट क्षेत्रात (Containment Area) वारंवार **जंतूनाशक औषधाची फवारणी** करून घ्यावी.
- कंटेनमेंट क्षेत्रात (Containment Area) साठी योग्य त्या **वैद्यकीय पथकाची नियुक्ती तालुका आरोग्य अधिकारी** यांनी तात्काळ करावी.
- सदर क्षेत्राच्या **चेकपोस्ट एक्झिट पॉईंटवर** आरोग्य क्षेत्रातील **पथकाव्दारे सातत्याने तपासणी** (Screening) केली जाईल.
- **सर्व नियुक्त क्षेत्रीय आरोग्य कर्मचारी हे पन्नास पन्नास घरांना भेट** देऊन **अहवाल** विहित नमुन्यात **साथरोग नियंत्रण अधिकारी** यांना सादर करतील.

Scanned with CamSc

- **सर्व पथकांनी** दररोज **कोव्हीड -19 च्या संशयास्पद केस**च्या परिक्षण करतील आणि ताप, खोकला, घसा खवखवणे आणि श्वास घेण्यास अडचण यासारख्या कोव्हीड -19 संसर्गाच्या **संभाव्य लक्षणांबद्दल शीघ्र प्रतिसाद पथक** (आरआरटी) **यांना कळवावे.**
- कोरोना विषाणु (कोव्हीड-19) लागण सिध्द (Positive) **रुग्णाचे संपर्कात आलेल्या सहवासित व्यक्तींचा तात्काळ शोध घेणे** आणि वैदयकीय पथकाचे निर्देशाप्रमाणे **HOME/INSTITUTIONAL Quarantine** ची आणि **इतर वैदयकीय कार्यवाही तातडीने** करणे.
- Home Quarantine ज्यांना **केलेले** आहे त्या **व्यक्तींचा वैदयकीय चाचणी अहवाल नकारात्मक** (Negative) येई **पर्यंत नियमित दैनंदिन पाठपुरावा** (भेट किंवा टेलीफोनव्दारे) करणेत यावा व त्यासाठी आवश्यक कर्मचारी नियुक्त करणेत यावेत. जर Home Quarantine केलेल्या **संशयित व्यक्तीचा अहवाल सकारात्मक** (Positive) आल्यास **संबंधित व्यक्तींच्या जवळच्या व्यक्तींना 14 दिवस Home Quarantine** करणेत यावे आणि पाटपुरावा 28 दिवस करावा.
- Infection संक्रमणाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी, संशयित संक्रमित व्यक्तीशी संपर्क झालेल्या सर्व संबंधित व्यक्तींना (सेल्फ डिक्लेरेशन फॉर्ममध्ये नमुद केलेले) संपर्क साधुन, होम कॉरेनटिन करण्याची कारवाई करुन त्यांच्याशी दररोज संपर्क साधुन ट्रॅक अहवाल सादर करणे.
- संबंधित ग्रामपंचायत **रजाळे** यांनी उपरोक्त परिसराची संपुर्ण स्वच्छता करुन अहवाल सादर करावा.
- मार्गदर्शक सुचनाप्रमाणे **चेकपोस्ट सुरु** कराव्यात आणि **संबंधित विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती** करावी.
- सर्व **संबंधित पथकातील नियुक्त सर्व अधिकारी/कर्मचारी** यांनी कामकाज करतांना **वैयक्तीक सुरक्षा उपकरणे** आणि **शासनाच्या आरोग्य विभागाचे मार्गदर्शक सुचनांचे पालन** करावे.
- सर्व संबंधित पथकातील नियुक्त **सर्व अधिकारी/कर्मचारी** यांनी **कामकाज** करतांना **फेस मास्क** वापरणे **बंधनकारक** राहील.

(स्वाक्षरी xxx)
(वसुमना पंत) भाप्रसे
**सहा.जिल्हाधिकारी तथा**
**उपविभागीय दंडाधिकारी,नंदुरबार भाग नंदुरबार**

**प्रत** :- मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नंदुरबार यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर
**प्रत** :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,नंदुरबार यांचे कडेस माहीती साठी सविनय सादर
**प्रत** :- मा.पोलीस अधिक्षक नंदुरबार यांचे कडेस माहीती साठी सविनय सादर
**प्रत** :- जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत** :- जिल्हा शल्य चिकीत्सक, नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत** :- तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत** :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती, नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत** :- पोलीस निरीक्षक शहर/तालुका/उपनगर पोलीस स्टेशन नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
**प्रत** :- ग्रामसेवक रजाळे/बलवंड यांना माहिती व उचित कार्यवाहीकामी.

उपविभागीय दंडाधिकारी नंदुरबार भाग
सत्यमेव जयते
नंदुरबार

Vasumana

(वसुमना पंत) भाप्रसे
**सहा.जिल्हाधिकारी तथा**
**उपविभागीय दंडाधिकारी,नंदुरबार भाग नंदुरबार**

Scanned with CamSc